# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र. / २२ /अ.क्र.८८११ /२५**

श्री. अनिल बांडे

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा नगर विकास विभाग (नवि-१८),**
४ था मजला (मुख्य इमारत) मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
नगर विकास विभाग (नवि-१८), ४ था मजला (मुख्य इमारत)
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१२.२०१९ | -- | ०६.०२.२०२० | २७.०२.२०२० |

प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, यात मागितलेली माहिती ही व्यापक व विस्तृत स्वरुपाची असून मुख्याधिकारी, शिरुर नगरपरिषद, जिल्हा-पुणे यांच्या विरोधात आलेल्या तक्रारी, त्यावर झालेली कार्यवाही व मुख्याधिकारी कार्यालयाने सादर केलेले खुलासे या स्वरुपाची माहिती असून जन माहिती अधिकाऱ्यांनी **नगरविकास-१८** या शिवाय **नगरविकास-१४** या कार्यासनाकडेही काही तक्रारी जात असल्याने माहिती गोळा करण्यास विलंब लागत असल्याचे नमूद केले.

अपिलीय सुनावणीत प्रकरणातील माहिती अधिकाऱ्यांविरुध्दच्या तक्रारी व चौकशीशी संबंधित असल्याने यात व्यापक जनहिताबाबत विचारणा केली असता अपिलार्थी फारसे समाधानकारक उत्तर देवू शकले नसल्याचेही यात नमूद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी व तत्कालिन अपिलिय अधिकारी तथा उप सचिव नगरविकास विभाग यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, शिरुर यांच्या विरुध्द दि.१८.०६.२०१६ ते ३०.१२.२०१९ या कालावधीत प्राप्त तक्रारींच्या प्रती व त्यातील अपिलार्थींच्या तक्रारी असल्यास त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती ही जन माहिती

अधिकारी **नगरविकास-१४** यांनी आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात विनामूल्य देण्याचे निर्देश दिले असून वरील आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज दाखल केला आहे.

मात्र आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थींना प्रथम अपिलिय अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर या संदर्भात माहिती प्रदान करण्यात आली असली तरी त्या संदर्भातील दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

तसेच मागितलेल्या माहितीचा कालावधी व अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाचे अनुपालन तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी केले असल्याने उपरोक्त अपिल अर्ज निकाली काढावा अशी विनंती केली असून, जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंती नुसार प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra